# <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ८२३/२०१९ मधील आदेश नि.क्र.१९</u>

१. वादी क्र.१ ते ५ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द प्रतिवादी यांनी दाखल केलेला प्रतिदाव्यावर पारीत झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल होवून त्यांची कैफियत व म्हणणे स्वीकारण्यात यावे याकरिता विनंती केली आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. प्रतिवादीने वादीविरुध्द प्रतिदावा दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी मुदतीत त्यांची कैफियत व म्हणणे दाखल केले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रतिदाव्यावर दि.९/६/२०२२ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आले आहे. सदर प्रतिदाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने वादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. अर्जामध्ये नमूद केलेले कारण वादी यांना कैफियत दाखल करण्याकरिता झालेला विलंब माफ करण्याकरिता संयुक्तिक आहे. वादी यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास वादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व वादीची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेतल्यास दावा व प्रतिदावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास कैफियत व म्हणणे दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता प्रतिवादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## <u>आ दे श</u>

१. वादी यांनी रक्कम रुपये रु.५००/– (रक्कम रुपये पाचशे) प्रतिवादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी प्रतिवादीस खर्चाची रक्कम दिल्यानंतर त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

३. वादी यांनी खर्चाची रक्कम प्रतिवादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

बार्शी. (श्रीमती एच.यु.यु.पाटील)

दिनांकः– २५/०८/२०२३ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y. V. Sital |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 25.8.2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 29.8.2023 |